**<u>विशेष दरखास्त क्र. १०/२०२१</u>**

*CNR No. MHSO060002592021*

कर्मयोगी सु.रा. परिचारक ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादीत

वि.

चंद्रकांत पाटील वगैरे

## <u>आदेश निशाणी क्र. २० आणि निशाणी क्र. १ वर</u>

ऋणको क्र. १ यांचे म्हणणे शिवाय ही दरखास्त पुढे चालवण्यात यावी असा आदेश करण्यात आला आहे. ऋणको क्र. १ यांनी असे नमूद केले की, आवश्यक माहिती व कागदपत्रे त्यांना उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे मुदतीत म्हणणे देता आले नाही. सबब ऋणको क्र. १ यांचे म्हणणेशिवाय प्रकरण पुढे चालवण्याचा झालेला आदेश रद्द करण्यात यावा.

०२. त्यावर धनको यांनी आक्षेप नोंदवला आहे. ऋणको क्र. १ हे या प्रकरणामध्ये दिनांक ०५/०४/२०२२ रोजी हजर झाले आहेत. तेंव्हापासून अद्याप त्यांनी त्यांचे म्हणणे दिले नाही. त्यासाठी कोणतेही योग्य कारण दिलेले नाही. केवळ धनको यांची रक्कम देण्यास विलंब ऋणको क्र. १ हे करत आहेत. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा असे त्यांनी नमूद केले.

०३. प्रकरणात अद्याप ऋणको क्र. ४ यांना बजावणी झाली नाही. ऋणको क्र. १ यांनी या अर्जासोबत त्यांचे म्हणणे दिले आहे. त्यामुळे या प्रकरणाचा गुणदोषावर अंतिम व योग्य न्यायनिर्णय होण्यासाठी ऋणको क्र. १ यांचे म्हणणेशिवाय प्रकरण पुढे चालवण्याच्या झालेला आदेश रद्द करुन त्यांनी दिलेले म्हणणे रेकॉर्डवर घेणे न्यायाच्या दृष्टीने योग्य राहील. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आ दे श</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. ऋणको क्र. १ यांचे म्हणणेशिवाय प्रकरण पुढे चालवण्याचा झालेला आदेश रद्द करण्यात येत आहे. त्यांनी दिलेले म्हणणे रेकॉर्डवर घेण्यात येत आहे.

SHRIKRISHNA HARIBHAU INAMDAR
Digitally signed by SHRIKRISHNA HARIBHAU INAMDAR
Date: 2023.04.18 13:38:36 +0530

दि. १८/०४/२०२३

( श्रीकृष्ण हरीभाऊ इनामदार )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपूर

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | A. S. Bavikar |
| Name of the Court | : | Jt. C.J.S.D., Pandharpur |
| Order signed by the P. O. on | : | 18/04/2023 |
| Order uploaded on | : | 18/04/2023 |